


गणेश इंटरनॅशनल स्कूलने सीबीएसई बोर्ड पॅटर्नुसार फीसमध्ये वाढ केली. याचा पालकांनी तीव्र निषेध करीत आज सकाळपासून शाळेसमोर आंदोलन केले.

# चिखलीतील गणेश इंटरनॅशनल स्कूलच्या फी वाढी विरोधात पालकांचे तीव्र आंदोलन

**पिंपरी :** चिखलीतील नेवाळे वस्ती येथील गणेश इंटरनॅशनल स्कूलने चालू शैक्षणिक वर्षात केलेल्या फी वाढी विरोधात पालकांचे शाळेसमोर तीव्र आंदोलन सुरू आहे. तीन वर्षानंतर १५ टक्के फी वाढ करण्याचा नियम असताना शाळा दरवर्षी फी वाढवत असल्याचा आरोप पालकांनी शाळेवर केला आहे.

गणेश इंटरनॅशनल स्कूलने सीबीएसई पॅटर्न शाळेत अवलंबत असल्याने सीबीएसई बोर्ड पॅटर्नुसार फी आकारण्याचे कारण देत शाळेने यावर्षी फीसमध्ये वाढ केली. याचा पालकांनी तीव्र निषेध करीत आज सकाळपासून शाळेसमोर आंदोलन करीत आहे. दर तीन वर्षांनी १५ टक्के फी वाढ करण्याचा नियम असताना शाळा दरवर्षी फी वाढ करीत आहे, असा आरोप पालकांनी केला आहे. तसेच शाळा सीबीएसई पॅटर्नचे कारण देते प्रत्यक्षात मात्र शाळेला सीबीएसई बोर्डाची मान्यता नाही. याशिवाय १३ जूनला शाळा सूरू होऊन ९ दिवस उलटल्यानंतर अद्यापही विद्यार्थ्यांना पुस्तक उपलब्ध करून देण्यात आलेले नाही. या सर्व बाबींचा निषेध करीत तब्बल १०० ते १५० पालकांचे शाळेच्या गेटसमोर आंदोलन सुरू आहे. यासर्व प्रकरणाबाबत शाळा प्रशासनासोबत संपर्क साधला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

# चाकणमधील कारखान्यात रिमोटद्वारे होणारी १८ लाखांची वीजचोरी उघड

**चाकण :** वीज यंत्रणेत फेरफार करून इलेक्ट्रॉनिक्स सर्कीटच्या माध्यमातून रिमोटद्वारे सुरु असलेली चाकण (ता. खेड) येथील दास एन्टरप्रायजेस या कारखान्यातील १८ लाख ३८ हजार ८८१ रुपयांची वीजचोरी महावितरणने उघडकीस आणली आहे. याप्रकरणी कारखान्याचे संचालक राजेंद्र गणपत धाडगे विरुद्ध नुकताच गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत माहिती अशी की, राजगुरुनगर विभाग अंतर्गत चाकण येथे तळेगाव रस्त्यावर मे. दास एन्टरप्रायजेस हा डायकास्टींग व मशिनिंगचा कारखाना आहे. उच्चदाब वीजजोडणी असलेल्या या कारखान्यातील वीजवापराबाबत अद्यावत तंत्रज्ञानातून केलेल्या विश्लेषणात संशय निर्माण झाला होता. त्यानुसार कारखान्यातील वीजमीटरच्या यंत्रणेची तपासणी करण्यात आली. यात वीजमीटर



यंत्रणेतील वायरिंगमध्ये फेरफार करून सीटी (करंट ट्रान्सफॉर्मर) सर्कीटकडे जाणारे वायर्स ब्रेक करून त्यामध्ये रिमोट कंट्रोलचे सर्कीट समाविष्ट केल्याचे आढळून आले. या सर्कीटच्या सहाय्याने वीजप्रवाह सुरु असतानाही रिमोट कंट्रोलद्वारे मीटरमधील वीज वापराची नोंद सोयीनुसार थांबविता येत असल्याचे दिसून आले. अशा अनधिकृत रिमोट कंट्रोलद्वारे दास एन्टरप्रायजेस कारखान्यात एकूण १,३८,४९० युनिटची म्हणजे १८ लाख ३८ हजार ८८९ रुपयांची वीजचोरी झाल्याचे निदर्शनात आले.

या कारखान्यातील वीजचोरी उघडकीस आणण्यासाठी मुख्य अभियंता रामराव मुंडे यांच्या मार्गदर्शनात अधीक्षक अभियंता श्री. सुनील पावडे (पुणे ग्रामीण मंडल), रमेश मलामे (चाचणी मंडल), उपमहाव्यवस्थापक एकनाथ चव्हाण (माहिती व तंत्रज्ञान), कार्यकारी अभियंता श्री. मनीष ठाकरे (राजगुरुनगर), सुरेश वानखेडे (चाचणी), उपकार्यकारी अभियंता मंगेश सोनवणे, अरविंद राऊत, सहाय्यक अभियंता एन. एस. रासकर, आर. के. पाटील तसेच तंत्रज्ञ अरविंद गव्हाणे, आर. एस. कहार आदींनी योगदान दिले.

दास एन्टप्रायजेस कारखान्यातील वीजचोरीप्रकरणी संचालक राजेंद्र गणपत धाडगे विरुद्ध रास्तापेठ (पुणे) येथील महावितरण पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायदा २००३ नुसार कलम १३५, १३८ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

# मेरी ॲन गोम्स आणि अभिजित गुप्ता ठरले एमसीएल २०१६ चे सर्वोत्तम खेळाडू

**पुणे :** मेरी ॲन गोम्स आणि अभिजित गुप्ता यांना महाराष्ट्र चेस लीग २०१६ च्या सर्वोत्तम खेळाडूचा किताब देण्यात आला. शेवटच्या फेरीत पुणे सांगली नेव्हीगेटर्सच्या भास्करन आदिबन याने जळगाव बॅटलर्सच्या सुनीलदत्त नारायणचा धुव्वा उडविला. या वर्षी लीगमध्ये पुणे ट्रू मास्टर्स संघाने तिसरा क्रमांक तर जळगाव बॅटलर्स यांनी दुसरा क्रमांक पटकाविला.

एमसीएलच्या ऑर्गनायझिंग कमिटीचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे यांच्या हस्ते खेळाडूंना पारितोषिके वितरीत करण्यात आली. या वेळी पीडीसीसीचे खजिनदार निरंजन गोडबोले, पीवायसी हिंदू जिमखानाचे अध्यक्ष विजय भावे, बँक ऑफ महाराष्ट्रचे असिस्टंट जनरल मॅनेजर रविंद्र चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

मेरी ॲन गोम्स आणि अभिजित गुप्ता यांना प्रत्येकी रोख १०,००० रुपये आणि चषक देवून गौरविण्यात आले. तर विजेत्या संघाला रुपये ३ लाख रोख आणि चषक देऊन गौरविण्यात आले. दुसऱ्या क्रमांकाच्या




जळगाव बॅटलर्सला १.७५ लाख रोख रक्कम आणि चषक देवून सन्मानित करण्यात आले. तसेच तिसऱ्या क्रमांकाच्या पुणे ट्रू मास्टर्स संघाला चषक देण्यात आला. याशिवाय सर्वोत्कृष्ट डग आउट डिझाईनसाठीचा पुरस्कार आरबीएस अहमदनगर चेकर्स या संघाला देण्यात आला.

# जळगाव बॅटलर्स मात करून पुणे-सांगलीचा विजय

**पुणे :** पुणे-सांगली नॅव्हीगेटर्सने चौथ्या पर्सिस्टंट महाराष्ट्र चेस लिगमध्ये पदार्पणात विजेतेपद मिळविले. जळगाव बॅटलर्सचे तगडे आव्हान पुणे-सांगलीने टायब्रेकमध्ये परतावून लावले. पुणे-सांगलीने बाद फेरीतील पराभवाची परतफेड करीत विजेतेपद खेचून आणले. पुणे-सांगलीचे विजेतेपद नक्की होताच त्यांच्या खेळाडू आणि फ्रँचायजी प्रमुखांनी एकच जल्लोष केला.

निर्धारीत जलद स्वरुपाच्या सहा डावांची अंतिम फेरी ३-३ अशी बरोबरीत सुटली. त्यामुळे टायब्रेकचा अवलंब करण्यात आला. त्यामध्ये अर्मागेडॉन पद्धतीचा डाव झाला. यात काळी मोहरी असलेल्या खेळाडूला चार मिनिटे, तर पांढरी मोहरी असलेल्या खेळाडूला पाच मिनिटे मिळतात. त्याचवेळी बरोबरी झाल्यास काळी मोहरी असलेल्या खेळाडूची सरशी होते. या आव्हानात्मक डावासाठी पुणे-सांगलीने बी. अधिबान, तर जळगाव बॅटलर्सने एस. एल. नारायणन याची निवड केली.

नाणेफेकीत पुणे-सांगलीच्या बाजूने कौल लागला. त्यांनी पांढऱ्या मोहऱ्यांची निवड केली. यात अधीबानने नारायणनवर मात केली. अधीबानकडून काल टायब्रेकमध्येच अवैध चाल झाली होती. त्यानंतरही पुणे-सांगलीने या ग्रँडमास्टरवरील विश्वास कायम ठेवत त्याला संधी दिली. अधीबानने संघाचा विश्वास सार्थ ठरविला.

महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना आणि पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्यावतीने



आयोजित स्पर्धा पीवायसी हिंदू जिमखान्यावर पार पडली. क्वालीफायर १ आणि एलिमिनीटर या काल झालेल्या बाद फेरीतील तीन पैकी पहिल्या दोन्ही लढती टायब्रेकमध्ये गेल्या होत्या. क्वालीफायर एकमध्ये पुणे-सांगली नॅव्हीगेटर्स आणि जळगाव बॅटलर्स यांच्यातच लढत झाली होती. त्यात जळगावने टायब्रेकमध्येच बाजी मारली होती. यावेळी सुद्धा रंगतदार निकालाची पुनरावृत्ती झाली. लढत त्याच संघांमध्ये असली तरी सहा पैकी केवळ एका डावात तेच प्रतिस्पर्धी खेळले. पाचव्या पटावर व्ही. वर्षिनी आणि कोनेरू हम्पी यांच्यात लढत झाली. काल हम्पीचा पराभव झाला होता. यावेळी इतर पाच डाव आधी संपले. याच दोघींची लढत सुरु होती. त्यात हम्पीने दडपणाखाली विजय मिळविला. त्यामुळे बरोबरी झाली.

अंतिम फेरीत सर्वाधिक सनसनाटी निकाल एस. एल. नारायणन याने नोंदविला. त्याने स्थानिक ग्रँडमास्टर अभिजीत कुंटेवर मात केली. पहिल्या दोन पटांवर जळगाव, तर पुढील दोन पटांवर पुणे-सांगलीचे खेळाडू जिंकले. त्यामुळे २-२अशी बरोबरी झाली. मग वूमन ग्रँडमास्टर मेरी ॲन गोम्सने इंटरनॅशनल मास्टर श्रीनाथ नारायणन याला सरस पटस्थितीच्या जोरावर चकविले. त्यामुळे पुणे-सांगलीला आघाडी मिळाली होती. हम्पीने पराभवाची परतफेड करीत बरोबरी साधली.

**अंतिम फेरीचा सविस्तर निकाल :** जळगाव बॅटलर्स बरोबरी विरुद्ध पुणे-सांगली नॅव्हीगेटर्स ३-३; आकाश ठाकूर पराभूत विरुद्ध स्वप्नील धोपाडे. अभिजीत कुंटे पराभूत वि. एस. एल. नारायणन. आदित्य उदेशी विवि आकांक्षा हगवणे. बी. अधिबान विवि महंमद नुबैरशाह शेख. व्ही. वर्षिनी पराभूत वि. कोनेरू हम्पी. मेरी ॲन गोम्स विवि श्रीनाथ नारायणन. अर्मागेडॉन डाव: एस. एल. नारायणन पराभूत वि. बी. अधिबान